महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १८ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये



महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

लक्षवेधी

## आरोग्य केंद्रात रुग्णांच्या जीवाशी खेळ



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे, सांडपाणी आणि दूषित पाण्यामुळे तालुक्यात डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे मलेरिया, डेंगी, टायफॉईड, सर्दी-ताप, खोकला, तसेच श्वानदंश, विंचूदंश आणि सर्पदंश यांसारख्या आजारांचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा गंभीर परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे रामभरोसे सोडण्यात आल्याचा आरोप समाजसेवक महेश देशमुख यांनी केला आहे.

देशमुख यांनी सांगितले, की निळजे, खडवली आणि दहागाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांसह १६ उपकेंद्रे काही काळासाठी बंद पडली होती. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी दुपारी दोन ते पाच वाजेपर्यंत कामाचा आढावा घेण्यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, लॅब टेक्निशियन आणि अन्य कर्मचाऱ्यांना बैठक बोलावली होती. त्यामुळे आरोग्य केंद्रे मनुष्यबळाविना राहिली. एखादा रुग्ण इमर्जन्सीमध्ये आला असता तर त्याचे जीव धोक्यात येऊ शकत होते, अशी चिंता देशमुख यांनी व्यक्त केली. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि गटविकास अधिकारी, पंचायत समिती कल्याण यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याची घोषणा केली आहे.

दहागाव केंद्राच्या हद्दीत येणाऱ्या म्हारळ, वरप, कांबा, रायते, गोवेली, खोणी यांसारख्या गावांमध्ये रुग्णसंख्या मोठी असून, डिलिव्हरी, किशोरवयीन मुलींचे आरोग्य, कुपोषित बालके, तसेच सर्पदंश आणि दंशग्रस्त रुग्णांचे प्रकरण वारंवार येते. या वेळी वैद्यकीय कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती गंभीर समस्या आहे. याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले, हा प्रकार चुकीचा आहे. पुढे असे होणार नाही, यासाठी कल्याण तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या जातील.

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त भगवद् गीतापाठ महायज्ञ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष, संस्कार भारती, संस्कृत भारती यांच्या वतीने श्रीगुरुकुलम् न्यासतर्फे श्रीमद् भगवद गीता पाठ महायज्ञ उत्साहात पार पडला. धार्मिक वातावरणात गीतेच्या श्लोकांचे पठण करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्यासाठी, देश, राज्य व समाजाच्या कल्याणासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. या कार्यक्रमाला भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या महायज्ञाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे बुधवारी (ता. १७) श्रीमद् भगवद् गीता पाठ महायज्ञ पार पडले. एकाच वेळी दोनशेहून अधिक जणांनी एकत्र येऊन श्रीमद् भगवद् गीतेतील सर्व श्लोकांचे लयबद्ध पठण करून गीतेच्या ज्ञानाचा अनुभव घेतला. सकाळपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गीतेच्या श्लोकांमध्ये सहभाग नोंदवला. यज्ञस्थळी मंत्रोच्चार आणि वेदघोष यामुळे परिसरात एक पवित्र व अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. यावेळी प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अॅड. प्रकाश बिनेदार, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, गुरुकुलम न्यास अध्यक्ष मंजिरी फडके, संस्कार भारतीच्या जुईली चव्हाण, संस्कृत भारतीच्या अनया करंदीकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला मोर्चा, युवा मोर्चा यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# ‘या घटनेला राजकीय रंग नको’

## मीनाताई ठाकरेंच्या पुतळ्यावर रंग फेकल्याच्या प्रकरणावर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया





**मुंबईतील शिवाजी पार्क येथील मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर आज रंग फेकण्यात आल्याची घटना घडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावर भाष्य केलं आहे.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** :मुंबईतील शिवाजी पार्क येथील मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर आज रंग फेकण्यात आल्याची घटना घडली आहे. मीनाताई ठाकरे या बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी आणि उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री आहेत. त्यामुळे शिवसैनिक त्यांना आदराने माँ साहेब म्हणतात. मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग फेकल्यामुळे शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. आता पोलीसांनी आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. अशातच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावर भाष्य केलं आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

### आरोपीला पोलीस शोधून काढतील आणि...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी याबाबत प्रश्न विचारला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ‘अशाप्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाज कंटकांनी हे कृत्य केलं आहे, त्याला पोलिस शोधून काढतील आणि त्याच्यावर कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणं मला योग्य वाटत नाही.’

### उद्धव ठाकरे काय म्हणाले?

या घटनेवर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ‘आजचा प्रकार अत्यंत निंदनीय होता. ज्याला स्वत:च्या आई-वडिलांची नाव घ्यायला शरम वाटते, त्याने हे केलं असावं. महाराष्ट्र पेटवण्याचा हा प्रयत्न असू शकतो. पोलीस या सगळ्या गोष्टीचा शोध घेत आहेत. बघू पुढे काय होतं. पोलीस म्हणतात की, आम्ही शोधून काढू. दोन प्रकारच्या व्यक्ती यामागे असू शकतात, ज्यांना स्वत:च्या आई-वडिलांच नाव घ्यायला लाज वाटते, शरम वाटते अशा लावारिस व्यक्तीने हे केलं असावं.’

### परिसरात बंदोबस्त वाढवला

आज पहाटे दादरच्या शिवाजी पार्क येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आई मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर अज्ञात व्यक्तींनी लाल रंग फेकला होता. या घटनेचा शिवसैनिकांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शिवाजी पार्क परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. काही वेळापूर्वी येथे फॉरेंसिक एक्सपर्टची टीम दाखल झाली होती. त्यांनी फेकलेल्या रंगाचे 5 सँपल गोळा करण्याचं काम सुरू केलं आहे.

## मुरबाड तालुका रिपाईच्या वतीने आमदार किसन कथोरेंचा वाढदिवस संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त संपुर्ण मतदार संघात गेले पंधरा दिवस विविध उपक्रम सुरु आहेत.आज मुरबाड तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) गटाच्या वतीने तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांच्या प्रमुख पुढाकाराने भव्य वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा मुरबाड एम.आय.डी.सभागृहात साजरा करण्यात आला.



यावेळी आयोजकांच्या वतीने वाढदिवसा निमित्त समाजातील विशेष कामगिरी केलेल्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षण ठरल्या त्या मुरबाडी बाई म्हणून सध्या सोशल मिडीया वर धुमाकूळ घालणाऱ्या प्राचीताई पाटील यांनी आपल्या खास मुरबाडी बोली भाषेत मनोरंजनातून प्रबोधन करत सर्वाचिच मने जिंकली.

तर आमदार कथोरे यांनी संबोधित करताना दिनेश उघडे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक करत मुरबाड मधील डॉ. बाबासाहेबांचा पुर्णाकृती पुतळा करण्यास मी आज ही तयार आहे फक्त तुम्ही जागा उपलब्ध करून द्या असे उपस्थित कार्यकत्यांना आश्वासन दिले असून आंबेटेभे येथिल माता भिमाई स्मारकावर माझे लक्ष असून तेही चांगल्या पद्धतीने करून घेणार असल्याचे म्हटले.तर आंबेडकरी समाज नेहमीच माझ्या सोबत राहिला असून माझे सर्वांशी जिव्हाळयाचे संबंध असल्याचे सांगितले. तर तालुक्यातील एकही कुटंब घरकुला वाचून वंचित राहता कामा नये रमाईच्या माध्यमातून हवा तेवढा इष्टांक मी देण्यास तयार असून कार्यकर्त्यांनी लक्ष द्यावे असे आवाहन केले.या कार्यक्रमाला ठाणे जिल्हा रिपाई निरिक्षक सुरेशदादा बारसिंग उपस्थित राहून मार्गदर्शन केले.तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाईचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मेहबुबभाई पैठणकर यांची उपस्थिती होती.

तसेच या कार्यक्रमासाठी उल्हास बांगर, प्रा.शरदचंद्र सोनवणे, प्रतिभाताई कांबळे उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांनी केले तर सुत्रसंचालन अॅड.शरद थोरात यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष कैलास देसले, महिला तालुका प्रमुख सुरेखा खोलांबे, दयानंद रातांबे, उपतालुका प्रमुख रमेश देसले,संजय खोलंबे,संतोष उघडे, भुपेश साटपे, जितेंद्र पंडित यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

## कोळसेवाडी पोलीस ठाण्यातील राडाप्रकरणी गणपत गायकवाड सेनेचे नीलेश शिंदे यांची निर्दोष मुक्तता



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील वाढत्या गुन्हेगारीच्या विरोधात २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन माजी नगरसेवक नीलेश शिंदे यांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यावर नागरिकांचा मोर्चा काढला होता. मोर्चाचे शिष्टमंडळ नीलेश शिंदे यांच्या पुढाकाराने वरिष्ठ पोलीस निरीक्षकांशी चर्चा करत असताना तेथे कल्याण पूर्वचे अपक्ष आमदार गणपत गायकवाड समर्थकांसह पोहचले. यावेळी गणपत गायकवाड समर्थक आणि नीलेश शिंदे यांच्यात शाब्दिक बाचाबाची होऊन पोलीस ठाण्यात दोन्ही गटात हमरीतुमरी झाली होती.

पोलीस ठाण्यात दालनामध्ये आमदार गायकवाड आणि शिंदे यांच्यासह समर्थकांनी राडा केल्याप्रकरणी पोलिसांनी गणपत गायकवाड, नीलेश शिंदे, गायकवाड समर्थक कुणाल पाटील, विक्की गणात्रा अशा एकूण पाच जणांवर दंगलीचा गुन्हा दाखल केला होता. आता नीलेश शिंदे हे शिंदे शिवसेनेचे कल्याण पूर्व शहरप्रमुख आहेत. याप्रकरणी पोलिसांनी चौकशी करून कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. अकरा वर्ष हा खटला न्यायालयात सुरू होता. अखेर याप्रकरणात न्यायालयाने गणपत गायकवाड, नीलेश शिंदे यांच्यासह त्यांच्या समर्थकांची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली.

हिललाईन पोलीस ठाण्यात माजी नगरेसवक महेश गायकवाड यांच्यावर दोन वर्षापूर्वी गोळीबार केल्याप्रकरणी गणपत गायकवाड हे तळोजा कारागृहात आहेत. गायकवाड हे कोळसेवाडी पोलीस ठाण्यातील गुन्ह्याप्रकरणी निर्दोष सुटले आहेत. त्यांचा हिललाईन पोलीस ठाण्यातील घटनेप्रकरणाचा खटला न्यायालयात सुरू आहे.

याप्रकरणी मिळालेली माहिती अशी, कल्याण पूर्वेत गुन्हेगारी, चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. या वाढत्या गुन्हे, चोऱ्यांमुळे नागरिक त्रस्त होते. त्यामुळे राष्ट्रवादीचे तत्कालीन माजी नगरसेवक नीलेश शिंदे यांनी नागरिकांचा विराट मोर्चा २०१४ मध्ये कोळसेवाडी पोलीस ठाण्यावर काढला होता. या कालावधीत कल्याण पूर्वचे आमदार म्हणून गणपत गायकवाड अपक्ष म्हणून निवडून आले होते. या निवडणुकीत नीलेश शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे गायकवाड यांच्या विरूध्द निवडणूक लढवली होती. त्यामुळे गायकवाड आणि शिंदे यांच्यात कुरबुऱ्या होत्या. आपल्या मतदारसंघात राष्ट्रवादीने मोर्चा काढल्याने आमदार गणपत गायकवाड यांना खटकले होते.









ठाणे • गुरुवार
• १८ सप्टेंबर २०२५
पान ४
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाचे यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये जीवनदीप शैक्षणिक संस्था कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत महाविद्यालयातील १२ जिद्दी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ कौशल्य, संघभावना आणि चिकाटी दाखवत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले.. संघाचे मार्गदर्शन प्रशिक्षक प्रा. सोनाली शेलार व प्राभुषण विशे यांनी केले. त्यांच्या कुशल प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने खेळ करत विजय मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. रवींद्र घोडविंद, प्राचार्य.मा.श्री. कैलास कळकटे व शिक्षकवृंद यांनी खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव केला असून पुढील पातळीवरील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## प्रबोधनकार ठाकरे यांना विधान भवनात अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी विधानसभा सदस्य विजय वडेट्टीवार, विधानपरिषद सदस्य संजय खोडके तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) जितेंद्र भोळे, सचिव (३) विलास आठवले, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव पंडीत खेडकर, उप सचिव विजय कोमटवार, उप सचिव सोमनाथ सानप, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी स्वाती ताडफळे, अवर सचिव (समिती) सुरेश मोगल यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## नवी दिल्लीत प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** : समाजप्रबोधनाचे महान कार्यकर्ते, विचारवंत आणि साहित्यिक प्रबोधनकार केशवसुत ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमास सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या प्र. उपसंचालक मनिषा पिंगळे, यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या सामाजिक, साहित्यिक आणि प्रबोधनपर कार्याचा परिचय सर्वांना करून दिला.

### शहापूर भूमी अभिलेख कार्यालयात

# सेवा पंधरवडा निमित्त विशेष उपक्रमांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर तालुका भूमी अभिलेख कार्यालयात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत या कालावधीत सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे

उपक्रमाबद्दल माहिती देताना शरद काळे उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी सांगितले की, शहापूर तालुक्यातील रस्ते नकाशात घेणे, खुले करणे,पाणंद रस्ते, आज वहिवाटीत असलेले रस्ते, अतिक्रमण झालेले रस्ते याबाबत नकाशात नसलेले रस्ते नकाशावर मोजून बसविलेले बंद असलेले रस्ते तहसीलदार यांचे सोबत संयुक्त मोहिमीने मोकळे करणे. या कामी प्रत्येक मंडळ मधून एक गाव या प्रमाणे पुढील कार्यक्रम लावण्यात आला आहे.त्यानूसार १९ सप्टेंबर रोजी आवाळे २) खैरे ३) जांभे ४) खर्डी या गावात तर २० सप्टेंबर रोजी १) साने २) साखरोली ३) मांजरे ४) बाभळे ५) कोथळे या गावात रस्ते मोजणी नकाशावर बसविणे कामी मोहीम हाती घेतली आहे. या कामी गाव कामगार, तलाठी व संबधित सर्कल व भूकरमापक यांचे पथकाकडून कामकाज होणार आहे.

तर फेरफार संदर्भात प्रलंबित कामकाज विशेष मोहीमेत तालुक्यातील फेरफार संदर्भात प्रलंबित कामकाज कामी विशेष मोहीमेत २३ सप्टेंबर रोजी मोखावणे, २४ सप्टेंबर रोजी किन्हवली व २५ सप्टेंबर रोजी खर्डी या गावात फेरफार अदालत, मयत धारकांचे वारस शोधणे व नगर भूमापन बाबत अडचणी सोडविणे कामी वरील गावात विशेष नियोजन केले आहे.

तसेच स्वामित्व मोहिमे अंतर्गत जनसामान्यांना त्याचा स्वामित्व ची सनद देणे बाबत शासनाचे धोरणा नुसार दिनांक २३ सप्टेंबर रोजी डोळखांब व हेदवली , २४ सप्टेंबर रोजी ठुने बुद्रुक व लवले, २५ सप्टेंबर रोजी नेहरोली व शेंदून बुद्रुक, २६ सप्टेंबर रोजी दहीगाव व घाणेपाडा आणि २७ सप्टेंबर रोजी सारमाळ व दहागाव या गावात सनद वाटप कार्यक्रम ठेवणेत आलेला आल्याचे शरद काळे उप अधीक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांनी सांगितले.

### गणित अध्यापक मंडळातर्फे

# विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ श्री बापूसाहेब विसपुते कॉलेज नवीन पनवेल येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विसपुते कॉलेजच्या प्राचार्या सौ. सीमा कांबळे मॅडम या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य सल्लागार समितीचे श्री. वीरसर आणि रायगड गणित अध्यापक मंडळाचे माजी अध्यक्ष श्री सोरटे सर शिरकांडे सर श्री घोडके सर श्री दिलीप मोरे सर सौ जोशी मॅडम तसेच भीमराव खेडकर आदी मान्यवर उपस्थित होते









कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले सी के टी इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूल मधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सी के टी च्या शिक्षिका मनीषा मॅडम यांनी केले गेल्या वर्षीच्या अहवालाचे वाचन व प्रास्ताविक रायगड गणित अध्यापक मंडळ परीक्षा समिती प्रमुख संतोष जाधव यांनी केले. गणित संबोध परीक्षा व प्राविण्य परीक्षा तसेच इयत्ता दहावीसाठी पारंगत परीक्षा यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी बसवावेत असे अहवालात सांगण्यात आले

प्रमुख पाहुणे श्री वीरसर यांनी मोजक्या शब्दात आयुष्याचे गणित मुलांना व पालकांना समजावून सांगितले श्री सोरटे सर यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले भीमराव खेडकर यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत स्पर्धेचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात सीमा कांबळे यांनी मुलांना आयुष्याची उद्दिष्टे व ध्येय साध्य करण्यासाठी अपार मेहनतीची गरज असते हे सांगितले.

गुणगौरव सोहळ्यामध्ये गणित संबोध परीक्षा इयत्ता पाचवी व आठवीसाठी एकूण 210 मेडल व सर्टिफिकेटचे वाटप करण्यात आले. गणित प्राविण्य परीक्षा व प्रज्ञा परीक्षा यामधील विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल व सर्टिफिकेट मंडळाकडून देण्यात आले. यावर्षी सौ म. ना. नेने कन्या विद्यालय पेण येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कुमारी रिद्धी सुनील मनोहर हिने महाराष्ट्र राज्यात 23 वा क्रमांक पटकावून शिष्यवृत्ती म्हणून रोख रक्कम1500 रुपये ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन मान्यवरांच्या हस्ते विशेष कौतुक व सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावीतील गणित पारंगत परीक्षेतील जिल्ह्यातील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी यांचाही सर्टिफिकेट व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विसपुते कॉलेजचा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,सी के टीचे मुख्याध्यापक श्री चव्हाण सर पर्यवेक्षिका सौ. गिरीजा मॅडम व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# डोहोळे ग्रामपंचायतीकडून विविध सोयीसुविधासाठी विविध उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) :** वासिंद जवळील डोहोळे ग्रामपंचायतीचा विकास होऊन नागरिकांना अनेक सोयी सुविधा मिळाव्या या उदात्त हेतूने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्याबरोबरच उपयुक्त अनेक सुविधा सुविधा निर्माण करून ग्रामपंचायत कारभार सुसज्ज बनविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

निवडणुकीमध्ये मतदारांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच आणि सदस्य यांनी एक दिलाने काम करण्याचे ठरविले आहे आणि म्हणूनच गेल्या दोन वर्षांपासून ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे या ग्रामपंचायत विभागाची घौडदौड सुरू असून यामध्ये विविध पुरस्कार प्राप्त करून या ग्रामपंचायत विभागांनी विविध उपक्रम हाती घेत ग्रामस्थांसाठी अनेक सोईसुविधा उपलब्ध केलेल्या दिसून येत आहेत. यामुळे नागरिकांना आपल्या विविध कामकाज व समस्या निर्वारणसाठी सोईस्कर झाले आहे.

डोहोळे या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये डोहोळे, कोशिंबी, कळंबोली, आन्हे व सोर हे गांव-पाडे आहेत. सदर ग्रामपंचायत विभागांनी पुढाकार घेत विविध उपक्रम व सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. येथील नागरिकांना स्वस्त दरात शुद्ध पाणी मिळावे यासाठी वॉटर एटीएम व इलेक्ट्रीक



मोटार सायकलसाठी ई-चार्जिंग स्टेशन सुरू केले आहे तर महिलां करीता सॅनिटरी (नॅपकीन) पॅड मशिन उपलब्ध करून या वापरानंतर त्या विल्हेवाटसाठी वेंडिग यंत्र (मशिन) बसविण्यात आले आहे. तसेच पाण्याची पातळी वाढावी यासाठी ग्रामपंचायत छतावरील पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंग द्वारे बोअरवेलमध्ये सोडून ग्रामपंचायत मध्ये निर्माण होणारा ओला कचऱ्यापासून बायोगॅस तयार करून कार्यालयातील किचन मध्ये वापरले जात आहे. कार्यालया सभोवती संरक्षण भिंत बांधून व रंगरंगोटी करून यावर विविध संदेश देणारे सुविचार, कार्यालय आवारात विविध झाडे व फुलझाडे वृक्षारोपण नर्सरी, गांडूळ खत निर्मिती तर विविध रोपांची वाफे तयार करून कार्यालयात भाजीपाला उपयोग केला जात आहे.त्याचबरोबर, टाकाऊ पदार्थ, कचरा वापरण्यायुक्त छोटे प्रकल्प तयार करून शोभेच्या वस्तू बनविण्यासाठी वापर केला जात आहे. तर कार्यालयात सिसिटिव्हि, तक्रारपेटी, माहिती अधिकार व विविध दाखले माहिती फळक, ओळा-सुका कचरापेटी, नागरीकांसाठी आसनव्यवस्था व घरपट्टी, पाणीपट्टी आरोग्यकर, दिवाबत्ती वसुली करीता डिजिटल स्कॅनर उपलब्ध अशा विविध सोयीसुविधा उपलब्ध करून सुसज्ज बनविल्याचे दिसून येते.

दरम्यान, ठाणे जिल्हा परिषद कडून आर.आर.(आबा) पाटील सुंदर गांव योजनेंतर्गत 'तालुका सुंदर गांव' दहा लाखांचा पुरस्कार या ग्रामपंचायतीला प्राप्त झाला आहे. तर 'माझी वसुंधरा अभियान' मध्येही चांगले काम केलेले असून याच योजनेत चाळीस लाखांचा जिल्हा स्तरावर प्रथम पुरस्कार व संत गाडगेबाबा महाराज ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्र संत तुकडोजी महाराज या स्पर्धेत जिल्हा स्तरीय प्रथम पुरस्कार घोषित झाले असून येत्या 17 सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान सहभागासाठी तयारी सुरू केली असल्याची माहिती ग्रामपंचायत प्रशासन विभागांनी दिली आहे. तर ग्रामपंचायत समिती यांच्या प्रयत्नामुळे, ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने ग्रामपंचायत माध्यमातून विविध विकासात्मक कामे व सोईसुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ग्रामविकास अधिकारी परेश सोनावणे यांनी म्हटले.





# मत्स्यपालन विषयी कार्यशाळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** केंद्रीय मात्सिकी शिक्षा संस्थान व आदिवासी एकता मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बिरसायत भवन मनोर येथे आयोजित मत्स्यपालन विषयी कार्यशाळा संपन्न झाली.

मत्स्यपालन आणि अनुवंशिकदृष्ट्या सुधारित माश्यांचे मत्स्यबीज, एक उपजिविकेचे साधन आहे या अनुषंगाने हि कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेत गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाचे प्रशिक्षण देण्यात आले तसेच पन्नास शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते मस्त्यबीजाचे वाटप करण्यात आले.





याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुंबई महानगर संघचालक सुरेशजी भगेरिया, मात्सिकी शिक्षा संस्थान संचालक डॉ. मुकुंद गोस्वामी, डॉ. किरण रसाळ, मत्स्य विकास विभागाचे निवृत्त उपाआयुक्त रविंद्र वायेडा, राजकुमार सिंगला, लेलीन सिंग, आदिवासी एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जनाठे, उपाध्यक्ष दामोदर कासट, मंगेश गोंड, सुनील किरकिरा आदि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तर यामध्ये पालघर जिल्ह्यातील शेतकरी वर्गांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

# जिल्हा परिषदेत अनेक शासकीय अभियानांच्या पूर्वतयारीसंदर्भात पत्रकार परिषद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

> **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानासोबत सेवा पंधरवडा, स्वच्छता ही सेवा, स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान, हरित महाराष्ट्र अभियान राष्ट्रीय पोषण माह या अभियानात ग्रामस्थांनी सहभाग घ्यावा"**
> **– मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे**

**ठाणे** : ग्रामीण विकास व पंचायत राज प्रणालीला बळकटी देणे, नागरिकांना शासनाच्या सेवा थेट उपलब्ध करून देणे, आरोग्य व पोषण जनजागृती वाढविणे तसेच स्वच्छता, लोकसहभाग यावर आधारित विविध राज्य व केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानांची ठाणे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. यासंदर्भातील पत्रकार परिषद आज, दि. १६ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी माहिती देताना सांगितले की, "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" हे ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करून समृध्द ग्रामीण भाग करण्यासाठी अभियान राबविले जात आहे.

सन २०२५-२६ पासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य या चार स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांना पुरस्कार दिले जाणार आहेत. या अभियानात सुशासन, सक्षम पंचायत, जलसमृद्ध व स्वच्छ गाव, सामाजिक न्याय, उपजीविका विकास, लोकसहभाग आणि नाविन्यपूर्ण उपक्रम या प्रमुख घटकांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

**अभियानाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत:-**

1. विकसित महाराष्ट्र २०४७ करिता पंचायत राज संस्था अधिक गतीमान करणे.
2. ग्रामपंचायतींमध्ये विकासाची निकोप स्पर्धा घडविणे.
3. अभियान कालावधी : १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५.
4. विकासाला लोकचळवळीचे स्वरूप देणे.
5. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
6. पुरस्कारासाठी एकूण तरतूद : २४५.२० कोटी रुपये
7. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या स्तरावर मिळून एकूण १,९०२ पुरस्कारांचे वितरण.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रधान सचिव (भा.प्र.से) एकनाथ डवले यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. ग्रामपंचायत, बांधकाम, शिक्षण, महिला व बाल कल्याण, पशुसंवर्धन, DRDA, MSRLM, महसूल, कृषि, समाजकल्याण, आरोग्य, पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन, जलसंधारण, मनरेगा अशा विविध विभागांचा सहभाग घेऊन तालुकास्तर व ग्रामस्तरावर विविध पुरस्कार मिळविण्यासाठी संबधित यंत्रणेमार्फत योग्य कार्यवाही केली जाणार आहे.

जिल्हा स्तरावरील अभियान शुभारंभ ग्रामपंचायत खोणी, पंचायत समिती कल्याण येथे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८:४५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तसेच १७ सप्टेंबर, २०२५ रोजी सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालक मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे शुभारंभ होणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व मा. खासदार व मा. आमदार त्यांच्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहून अभियानाचे शुभारंभ करणार आहेत.

**हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान**

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, "हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियान" अंतर्गत वृक्षारोपण, शाश्वत हरितीकरण, जलसंधारण आणि पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर दिला जात आहे. स्थानिक संस्था, शाळा, स्वयंसेवी संघटना आणि ग्रामस्थांचा या अभियानात मोठ्या प्रमाणात सहभाग राहील.

राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी "हरित महाराष्ट्र – समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत वर्ष २०२५ मध्ये १० कोटी वृक्ष लागवड लोकचळवळ उभी करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने, ग्रामविकास विभागाच्या दि. २८ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयानुसार एकूण १ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यापैकी ठाणे जिल्हा परिषदेस १,५४,३०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ५ तालुक्यांमधील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी एकत्रित वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे.

**सेवा पंधरवडा**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) अविनाश फडतरे यांनी सांगितले की, भारत सरकारतर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा साजरा केला जातो. यामध्ये आरोग्य शिबिरे, पोषण उपक्रम, रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान तसेच शासकीय सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती व संस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

**स्वच्छता ही सेवा**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पा.पु.) पंडित राठोड यांनी स्पष्ट केले की, या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा अभियानाची थीम "स्वच्छोत्सव" असून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान हा पंधरवडा राबवला जाणार आहे.

यामध्ये स्वच्छता लक्ष युनिट्स (CTUs) स्थापन करून अस्वच्छ ठिकाणांची साफसफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाई मित्र सुरक्षा शिबिरे, "एक दिवस – एक तास – एक साथ" उपक्रमाअंतर्गत २५ सप्टेंबर रोजी महाश्रमदान तसेच विशेष ग्रामसभेद्वारे स्वच्छ सुजल गाव घोषीत करणे यांचा समावेश आहे.

**स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान "स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान" राबवले जाणार आहे.

यामध्ये महिलांची सर्वांगीण आरोग्य तज्ञ डॉक्टर मार्फत वैद्यकीय तपासणी, कर्करोग व मधुमेह निदान, माता व बाल संरक्षण कार्ड वितरण, लसीकरण, मासिक पाळी स्वच्छता व पोषण सत्र, क्षयरुग्णांना दत्तक घेण्यासाठी "निक्षय मित्र अभियान", तसेच रक्तदान शिबिरे यांचा समावेश असेल. आभा (ABHA) कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PM-JAY) नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**राष्ट्रीय पोषण माह**

महिला व बालकल्याण अधिकारी श्री. संजय बागुल यांनी सांगितले की, यावर्षी १७ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर दरम्यान "राष्ट्रीय पोषण माह" साजरा होणार आहे.

लठ्ठपणा नियंत्रण, पोषण भी – पढ़ाई भी, एक पेड माँ के नाम, बालक आहार पद्धती, Men-Streaming आणि Vocal for Local या सहा प्रमुख थीम्स अंतर्गत विविध कार्यक्रम जिल्ह्यात राबवले जातील. विशेषतः स्थानिक आहाराला प्रोत्साहन, तृणधान्ययुक्त पदार्थांचा प्रसार, पोषण वाटिका, महिला कलाकारांना व्यासपीठ आणि बालकांच्या पोषणाविषयी जनजागृती या गोष्टींवर भर दिला जाणार आहे.

या सर्व अभियानांचा उद्देश ठाणे जिल्ह्यात ग्रामपंचायतींमार्फत लोकसहभागातून शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवणे, स्वच्छता, आरोग्य, पोषण, पर्यावरण व ग्रामविकास यांचा समन्वय साधणे आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधणे असून ठाणे जिल्हा परिषदेमार्फत ठाणे जिल्ह्यातील ग्रामस्थांना या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.





*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*